रजि. नं. एस.ए.टी. / माण/बी.एन.के./ओ./११९, सन १९९६
दि. ३१/१०/९६, एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी.

माणदेशी
महिला सहकारी बँक लि., म्हसवड

ता. माण, जि. सातारा

व्यथा दुष्काळाची...
गाथा माणदेशी छावणीची .... !



१५ वा
वार्षिक अहवाल
सन २०११-२०१२
ऑडीट वर्ग 'अ'

संचालक मंडळ (सन २०११-१२ ते २०१६-१७)

श्रीमती चेतना वि. सिन्हा
अध्यक्षा (म्हसवड)

सौ. निर्मला म. मोरे
उपाध्यक्षा (गोंदवले खुर्द)

माण देशी
बँक

सौ. मंजुषा रा. सुर्यवंशी
संचालिका (म्हसवड)

सौ. गीता ग. रसाळ
संचालिका (म्हसवड)

सौ. स्वाती नि. चिंचकर
संचालिका (म्हसवड)

सौ. ललीता सा. पोळ
संचालिका (देवापूर)

सौ. संगिता म. काटकर
संचालिका (कुकुडवाड)

सौ. वर्षा ल. खाडे
संचालिका (पळशी)

सौ. राणी सं. गोरड
संचालिका (दिडवाघवाडी)

सौ. विमल दि. घुटुकडे
संचालिका (विरळी)

सौ.राजश्री नि. दोशी
संचालिका (म्हसवड)



सौ. वनिता जा. पिसे
संचालिका (म्हसवड)

सौ. शारदा बा. मदने
संचालिका (बनगरवाडी)

सौ. सिताबाई आ. पुकळे
संचालिका (पुकळेवाडी)

सौ. रेखा अशोक कट्टे
संचालिका (गोंदवले बु.)

सौ. नूतन प्र. शेटे
संचालिका (वडूज)

सौ. कांचन कि. शिंदे
संचालिका (बोथे)

सौ. स्नेहलता बा. आटपाडकर
संचालिका (वर-मलवडी)

सौ. अरूणा अ. सावंत
संचालिका (क्षेत्र माहुली)

श्री. काशीनाथ द. राऊत
तज्ञ संचालक (गोंदवले बु।।)

श्री. विजयकुमार केसकर
तज्ञ संचालक (गोंदवले बु।।)



सौ. रेखा सु. कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी

''माणदेशी चेंबर ऑफ कॉमर्स'' च्या उद्‌घाटन प्रसंगी मा. आमदार श्री. जयकुमार गोरे, मा. डॉ. रामास्वामी एन. जिल्हाधिकारी सातारा, मा. श्री. के. एम. प्रसन्ना, पोलिस अधिक्षक, सातारा, मा. श्री. शाम देशपांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सातारा तसेच रूक्मिणी वेमराजू, सिमका, सौ. सोनिया गोरे, प्रा. शमा दलवाई, श्रीमती चेतना सिन्हा व उद्योजिका महिला.

वर्धापनदिनानिमित्ताने माणदेशी बँकेने सातारा येथे ''माणदेशी मार्केटींग महोत्सव'' आयेजित केला होता त्याप्रसंगीचे छायाचित्र

''माणदेशी उद्योजिका'' कार्यक्रम सन २०११ मध्ये सहभागी झालेल्या यशस्वी उद्योजिका महिलांना पुरस्कार देऊन सन्मानित केले त्याप्रसंगीचे छायाचित्र

वर्धापनदिनानिमित्त माणदेशी बँकेने आयोजित केलेल्या ''माणदेशी मार्केटींग महोत्सव'' प्रसंगी श्रीमती सुवर्णादेवी पाटील नगरसेविका सातारा व श्रीमती चेतना सिन्हा, बालचमू ॐ कलाविष्कार ग्रुप, म्हसवडच्या कलाकारांचे अभिनंदन करताना.

''माणदेशी मार्केटींग महोत्सव'' प्रसंगी श्री. छ. सौ. दमयंतीराजे भोसले यांचा सत्कार करताना माणदेशी महिला, सोबत श्रीमती चेतना सिन्हा

''माणदेशी मार्केटींग महोत्सव'' प्रसंगी ग्रामीण शाळकरी मुलींना सायकल वाटप करताना मा. श्री. के. एम. प्रसन्ना पोलिस अधिक्षक, सातारा, सोबत सौ. मुक्ता लेवे, नगराध्यक्षा, सातारा, श्रीमती चेतना सिन्हा व संचालक

१५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपल्या बँकेची पंधरावी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ११।८।२०१२ रोजी दुपारी १ वाजता माणदेशी महिला सह. बँक लि. म्हसवड येथे खालील विषयावर विचार विनिमय करणेसाठी होणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

• सभेपुढील विषय •

१. मागील दिनांक १४ -९-२०११ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.

२. दि. ३१ मार्च २०१२ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक वाचून मंजूर करणे.

३. सन २०११-२०१२ मधील नफ्याची मा. संचालक मंडळाने सुचविलेनुसार नफा वाटणीस मंजुरी देणे.

४. सन २०११-२०१२ चे शासकिय लेखापरिक्षण अहवाल वाचून नोंद घेणे.

५. सन २०१२ - २०१३ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत हिशोब तपासणीसाची नेमणूक करणे व त्याचे मानधन ठरविणे.

६. सन २०१२ - २०१३ सालाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०११- २०१२ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा ज्या बाबीवर अधिक खर्च झाला आहे. त्यास मान्यता देणे.

७. संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत चर्चा करणे.

८. पोट नियम दुरुस्तीबाबत चर्चा करणे.

९. माणदेशी महिला सहकारी बँक व माणदेशी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेल्या उपक्रमांची चर्चा करुन नोंद घेणे.

१०. शाखा विस्तारास मान्यता देणे .

११. मा. अध्यक्षांच्या पुर्वपरवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर विचार करणे.

संचालक मंडळाच्या हुकुमावरुन

माणदेशी महिला सह. बँक लि. म्हसवड

दि. २६/७/२०१२
स्थळ :- माणदेशी फौंडेशन,नविन इमारत,
सातारा-पंढरपूर रोड, भागवत एजन्सीज शेजारी
म्हसवड
वेळ: दुपारी १ वा.

सौ. रेखा सु. कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी
माणदेशी महिला सह. बँक लि. म्हसवड

विशेष सुचना :-

१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासांनंतर सभा घेणेत येईल.

२. सभेच्या वेळी विचारावयाचे प्रश्न आणि सुचना दि. ३/८/२०१२ पूर्वी बँकेच्या कार्यालयात मिळतील अशा रितीने पाठवाव्यात.

सन्माननीय सभासद भगिनींनो,

माणदेशी महिला सहकारी बँकेने १६ व्या वर्षात पदार्पण केले आहे. दरवर्षी अहवाल सादर करताना एक विशेष आनंद असतो मनात. पण ह्यावर्षीच चित्र मन विषण्ण करुन टाकणारे आहे कारण माण तालुक्यावर दुष्काळाचे गंभीर सावट पडले आहे. माण तालुका सध्या प्रचंड मोठ्या दुष्काळाच्या छायेत अडकला आहे. ग्रामीण लोकांना पाण्यासाठी पाच ते दहा कि.मी. भटकंती करुनही पाणी मिळत नाही. दुष्काळामुळे माणदेशी जनतेबरोबर जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

माणदेशातल्या शेतकरी कुटूंबाने यंदा बेंदूर छावणीवर केला. बेंदूर बैलांचा वर्षाचा सण पण बैल व बैलांचा मालक छावणीवर तर बेंदूर छाणीवरच होणार. माणदेशी फौंडेशनने २१ एप्रिलला जनावरांची छावणी चालू केली. गेल्या दोन वर्षापासून माणदेशात पाऊस नाही. माण तालुक्यातल्या गावात वीस दिवसांनी टँकरनं पाणी येते. जगाचा अन्नदाता आज आपल्या मुलाबाळांसह व गुरांसह छावणीत आहे. शेतकरी कधी भीख मागत नाही. शेतात कष्ट करुन दुपारी झाडाखाली जेवायला बसला तरी रस्त्यांनी जाणाऱ्याला भाकरीचा रुमाल सोडताना म्हणणार ''या जेवायला'' नंतरच आपल्या तोंडात घास घालणार. आज त्या शेतकऱ्यांना चारा, पाण्यासाठी घर सोडून छावणीत यावे लागले. आज दुष्काळ आहे किंवा पाण्याचा प्रश्न आहे, त्याचे कारण नियोजनाचा अभाव.

माणदेशी फौंडेशनने सुरु केलेल्या ''जनावरांच्या चारा छावणी'' मध्ये ११४०० जनावरे व सुमारे ४००० लोक आसऱ्याला आहेत. माणदेशीने ही ठरविले, छावणीत शेतकऱ्यांना घरासारखी व्यवस्था केली गेली पाहिजे. म्हणून छावणी वर चारा, पाणी, पेंड, शेडनेट येणाऱ्या जाणाऱ्यासाठी रिक्षा सर्व सोयी करण्यात आल्या. सरकारने पण छावणीला चारा व खाद्य द्यायची मदत केली. एवढेच नव्हे तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शेतकऱ्यांना भेटायला छावणीत आले आणि शेतकऱ्यांना हिम्मत दिली की ही छावणी शेवटची असेल म्हणजे माणदेशाचा पाणी प्रश्न आता मा. आमदार जयकुमार गोरे भाऊंच्या नेतृत्वाखाली सोडवणार परत शेतकऱ्यांना छावणीत यायची गरज भासणार नाही.

आज या अहवालाद्वारे मी जनतेला आव्हान करते की, येथून पुढे अशी छावणी उभी नाही राहिली पाहीजे. यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री साहेबांना तर निवेदन दिलेच आहे पण अमेरिकेच्या प्रतिष्ठित उद्योजक व भारतातील प्रतिष्ठीत मंडळींची सभा बोलवून माण तालुक्याचा पाण्याचा प्रश्न कायमचा कसा सुटेल ह्यासाठी प्रयत्न करणार आहे.

२०१२ हे वर्ष माणदेशी बँकेसाठी तसे ऐतिहासीक वर्ष ठरले आहे. कारण सहा महिन्यात माणदेशीमध्ये बऱ्याच घडामोडी झाल्या. आज १,५५,००० ग्राहकांना सेवा देत असलेली ह्या बँकेने पहिल्यांदाच माणदेशी फौंडेशन ह्या संस्थेच्या मदतीने साताऱ्यामध्ये उद्योजिका महिलांसाठी ''माणदेशी मार्केटींग महोत्सव ''भरवला व महिलांना बाजारपेठ उपलब्ध करुन दिली. महिलांना खऱ्या अर्थाने यशस्वी करायचे असेल तर त्यांचे स्वत:चे अस्तित्व निर्माण केले पाहीजे. उद्योजिका महिलांना प्रसिद्धी देणे, त्यांच्या मालाची जाहिरात

करणे, त्यांना विविध संम्मेलनासाठी पाठविणे. मार्केटिंगसाठी मदत करणे, त्यांच्या व्यवसायाची पेपरमध्ये जाहिरात करणे, व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध करुन देणे मालाला बाजारपेठ मिळवून देणेसाठी स्टॉल लावणे अशा विविध मार्गांनी माणदेशी अप्रत्यक्षरित्या महिलांचे अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करते.

माणदेशी उद्योगिनी (व्यवसाय शाळा) अंतर्गत चालू केलेल्या माणदेशी उद्योजिका या कार्यक्रमामध्ये २०११ साली ज्या उद्योजिका महिलांनी सहभाग घेतला व आपला व्यवसाय यशस्वी केला त्या महिलांना पुरस्कार दिले व त्यांचा गौरव केला. १३ एप्रिल २०१२ रोजी '' माणदेशी चेंबर ऑफ कॉमर्स '' चे उद्घाटन करुन उद्योजिका महिलांची संघटना निर्माण करणे व त्यांच्या अडचणी सोडविणेसाठी नवे दालन खुले केले आहे. ह्याची सुरवात महिलांसाठी '' टोल फ्री '' नंबर व ''एम्प्लॉयमेंट एक्सचेंज '' ची सुवधा उपलब्ध करुन देवून झालेली आहे. माणदेशी उद्योगिनीद्वारे ४६००० पेक्षा जास्त महिलांनी व्यवसायिक प्रशिक्षण घेतलेले आहेत व आपल्या व्यवसायामध्ये प्रगती घडवून आणलेली आहे. ह्या वर्षी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र म्हसवड येथे चालू करण्यात आलेले आहे. ज्या महिला व मुलींचे काही कारणामुळे शिक्षण अर्धवट राहिले आहे त्या मुलींसाठी हे नवीन दालन खुले करुन देण्यात आले आहे.

गतवर्षी मधील आनंदाचा क्षण म्हणजे माणच्या खेळाडूंनी क्रिडा क्षेत्रात लावलेला झेंडा. ज्यावेळी ''माणदेशी क्रिडा संकुल'' च्या २८ विद्यार्थ्यांची ''बालेवाडी क्रिडा प्रबोधनी'' मध्ये निवड झाली. आणि विशेष बाब म्हणजे माणदेशातील खोरेवाडी या दुर्गम भागातील १६ विद्यार्थींचा सहभाग त्यात आहे. आजच्या या दुष्काळजन्य परिस्थितीतला हा एकच होता ''ओला क्षण''

माणदेशी बँकेच्या सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार व कर्जदारांनी आपले जे अनमोल योगदान दिले अशाच सहकार्याची अपेक्षा बँकेला आपल्या सर्व खातेदारांकडून आहे.

आपली स्नेहांकित,
श्रीमती चेतना सिन्हा, अध्यक्षा

चालू वर्षातील घडामोडी

व्यथा दुष्काळाची ....
गाथा माणदेशी छावणीची ....!

आठ वर्षाच्या वयात, आठ नंबरचा जाड भिंगाचा चश्मा लागलेली, बोनेवाडीची चिमुरडी ''आशा'' आज माणदेशी चारा छावणीमध्ये आपल्या जनावरांची देखरेख करीत आहे. बहिणीचे लग्न व आई मोलमजूरी करीत असल्यामुळे जनावरांचे देखभालीचे काम आशावर येवून पडले. दररोज शाळेत जायचे, मग छावणीवर येवून जनावरांना खाऊपिऊ घालायचे, छावणीत स्वच्छता करावयाची व परत ७ किमी दूर आपल्या घरी जायचे आशाचे स्वप्न आहे '' डॉक्टर '' बनायचे.

आशासारखीच बरीच कुटूंबे आज माणदेशी फौंडेशनने सुरु केलेल्या '' माणदेशी चारा छावणीच्या '' आसऱ्याला आहेत. ११४०० जनावरे व ४००० शेतकरी छावणीमध्ये तीन दगडांची चूल मांडून आपला प्रपंच मांडून बसलेले आहेत. गावातल्या आयाबाया म्हणतात आमच्या घरात पाणी नसल तरी चालल. पण भाऊच्या(विजय सिन्हा) छावणीला पाणी द्या. ''दुष्काळान आम्हाला मारंल,पण माणदेशीन तारल'' हे सांगत असताना शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रु दाटून येतात. काय केलय माणदेशीने ? माणदेशीने फक्त आधार दिला. आपण सर्व प्रार्थना करुया की, अशी छावणी उभारण्याची परत कधीच वेळ यायला नको.

माणदेशी मार्केटींग महोत्सव :-

''माझा सगळा माल विकला गेला, आणि महोत्सवामुळे माझ्या व्यवसायिक महिलांशी ओळखी झाल्या व त्यांच्या अनुभवातून शिकायला मिळाले'', सातारा येथे ९ मार्च ते ११ मार्च रोजी आयोजित केलेल्या मार्केटींग महोत्सवामधील शेतकरी महिलेनं काढलेले हे उद्‌गार आहेत. मार्केटींग महोत्सवाचे आयोजन शेतकरी महिलांच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी केले होते. महोत्सवाचे विशेष हे होते की, माणदेशाची खासियत म्हणजे जेन, घोंगडी, देशी ज्वारी, बाजरी, कडधान्य, खलबत्ते, चुली, जाती, इरकल साड्या इ. गोष्टी खास सातारकरांसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. थोडक्यात शेतकरी ते ग्राहक असा थेट मेळ घातल्यामुळे शेतकऱ्यांना योग्य भाव व ग्राहकांना रास्त दर मिळाला. जवळजवळ सातारा जिल्हयातील २०० गावांमधून १०० महिलांचे स्टॉल लावण्यात आलेले होते. अपेक्षापेक्षा जास्त प्रतिसाद, ३०००० लोकांची महोत्सास भेट व लाखो रुपयांची उलाढाल माणदेशी मार्केटींग महोत्सवामध्ये झाली.

माणदेशी चेंबर ऑफ कॉमर्स फॉर रुरल वुमन चे उद्‌घाटन:-

माणदेशी चेंबर ऑफ कामर्सचे मुख्य उद्दिष्ट ग्रामीण भागातील महिला उद्योजकांना मार्गदर्शन धोरणात्मक सल्ला, नवीन कल्पना व माहिती देणे आहे. चेंबर ऑफ कॉमर्सचे उद्‌घाटन १३ एप्रिल २०१२ रोजी पार पडले. ह्या उपक्रमाची सुरुवात करुन माणदेशीने इतिहासात एक आगळा वेगळा पायंडा रचला गेला आहे. चेंबर ऑफ कॉमर्ससाठी माणदेशीने प्रेसिडेंट क्लींटन फौंडेशनचा कार्यक्रम '' क्लींटन ग्लोबल इनिशिएटिव्ह '' बरोबर भागदिरी केली आहे. महिलांना व्यवसाय उपलब्ध करुन देणे व्यवसायासाठी बाजारपेठ उपलब्ध करुन देणे, त्यांना आर्थिक दृष्ट्या स्वत:च्या पायावर उभे करणे, साक्षरतेचे महत्व पटवून देणे, त्यांना बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक स्थिरता प्राप्त करुन देणे, व्यवसायासाठी लागणारे तांत्रिक, कायदेशीर व व्यवस्थापन ज्ञान या सर्व बाबींची माहिती देणाऱ्या विभागांनी संयुक्त असे ''चेंबर ऑफ कॉमर्स '' हा महाराष्ट्रातील महिलांनी महिलांसाठी चालविला जाणारा पहिला उपक्रम आहे. महिलांचे शिक्षण व आर्थिक स्वावलंबनाद्वारे सक्षमीकरण यासाठी माणदेशी विविध स्तरावर प्रयत्न करत आहे. ह्याची सुरुवात महिलांसाठी ''टोल फ्री'' नंबर व ''एम्पलॉयमेंट एक्सचेंज'' ची सुविधा उपलब्ध करुन देवून झालेली आहे.

माणदेशी उद्योजिका:-

स्त्री शक्तीचा सन्मान '' माणदेशी उद्योजिका २०१२'' ह्या कार्यक्रमाच्या पारितोषिक वितरण समारंभाचे देखील आयोजन चेंबर ऑफ कॉमर्सचे उद्घाटनप्रसंगी केले होते. माणदेशी उद्योजिका हा ''माणदेशी उद्योगीनी '' (Founding sponsor by HSBC) या व्यवसाय शाळेचा उपक्रम आहे. ग्रामीण भागातील महिलांनी माणदेशी उद्योजिका कार्यक्रमात सहभाग घेवून अतिशय प्रतिकुल वातावरण व बिकट आर्थिक परिस्थितीशी सामना करत, स्वत:च्या हिंमतीवर अतोनात कष्ट करुन चिकाटीने व्यवसाय करुन तो नावारुपाला आणला. आज त्या एक यशस्वी उद्योजिका म्हणून स्वत:च्या पायावर उभ्या आहेत. अशा महिलांना '' माणदेशी उद्योजिका '' हा पुरस्कार दिला जातो. हा कार्यक्रम यशस्वी उद्योजिका तर घडवणारच आहे. पण इतर उद्योजिका महिलांसाठी प्रेरणात्मक ठरणार आहे.

१००% ग्रामीण महिलांचा बँकिंग क्षेत्रात सहभाग- फायनान्शियल इन्क्लुजन प्रोग्रॅम:-

माणदेशीचा कल कायम ग्रामीण महिलांना त्यांच्या गरजेप्रमाणे सुविधा देण्याचा असल्यामुळे सन २०१२ मध्ये बँकेने ग्रामीण महिलांच्या मुलाखती घेवून त्यांच्या दररोज येणारी मिळकत व खर्चाचा आढावा घेतला. उद्देश असा की, महिलांचा कॅश फ्लो (आवक जावक) प्रमाणे बँकेच्या योजना तयार करणे. लवकरच माणदेशी बँक ही योजना तयार करुन १००% ग्रामीण महिलांना बँकेच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी सोय उपलब्ध करुन देणार आहे.

क्लिंटन ग्लोबल इनिशिएटिव्ह भागीदारी:- माणदेशी फौंडेशनने अमेरिकेचे पूर्व राष्ट्रपती बिल क्लिंटन यांच्या न्युयॉर्क स्थित ''क्लिंटन ग्लोबल इनिशिएटिव्ह '' (सीजीआय) या संस्थेशी '' माणदेशी चेंबर ऑफ कॉमर्स ''या उपक्रमासाठी भागीदारी केली आहे. या संदर्भात माणदेशी बँकेच्या अध्यक्षा श्रीमती चेतना सिन्हा यांना सप्टेंबर, २०११ मध्ये न्युयॉर्क येथे क्लिंटन ग्लोबल इनिशिएटिव्ह या परिषदेसाठी आमंत्रित करण्यात आले होते.

माणदेशी एफ एम तरंग:-

माणदेशी एफ.एम. तरंग (कम्युनिटी रेडिओ स्टेशन) ने उत्तुंग भरारी तर मारली आहे. माणदेशी तरंग वाहिनी स्टुडीओत कार्यक्रमाची निर्मीती माणदेशी लोकांच्या मार्फत त्यांच्या कलागुणांच्या समावेशासह करण्यात येवून त्यांचे प्रसारण सकाळी ७ ते ८.३०, दुपारी १२.३० ते १.३० महिला विशेष प्रसारण सभा आणि सायंकाळी ७ ते ८.३० दुसरी प्रसारण सभा अशा पद्धतीने दररोज करण्यात येते. कॉमनवेल्थ मिडिया सेंटर फॉर एशिया नवी दिल्ली यांच्या सहकार्याने माणदेशी महिला श्रोत्यांसाठी गोंदावले बु ।। येथे २४ ते २७ ऑगस्ट दरम्यान प्रशिक्षण देण्यासाठी कार्यशाळा घेण्यात आली ज्यामध्ये CEMCA च्या संशोधन अधिकारी श्रीमती रुक्मीणी वेमराज सहभागी होत्या. वसुंधरा कम्युनिटी रेडिओचे युवराज जाधव, दिपक राजेमाने, विद्यावाणी पुणे चे श्री. दत्ता गायकवाड सहभागी होते. या उपक्रमात २७ महिलांना प्रशिक्षण मिळाले. म्हसवड येथे महिलांसाठी १ ते ५ नोव्हेंबर कालावधीत पुन्हा प्रशिक्षण वर्ग CEMCA च्या वतीने माणदेशी तरंग वाहिनी ने आयोजित केला त्यात ३० महिलांना प्रशिक्षण दिले.

माणदेशी क्रिडा संकुल:-

माणदेशी चॅम्पियन (क्रिडा संकुल) च्या २८ विद्यार्थ्यांची पुणे बालेवाडी येथील प्रबोधिनीसाठी निवड झालेली आहे. क्रिडा प्रबोधिनीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता बारावीपर्यंत मोफत शिक्षणाचा लाभ, एका विद्यार्थ्यास प्रतिवर्षी किमान दिड लाख रुपयाची खर्चाची तरतूद, ऑलिम्पिक स्पर्धेस पात्र ठरले अशा अद्ययावत मोफत क्रिडा प्रशिक्षणाची सोय तसेच शासकिय सेवेत क्रिडा खेळाडू म्हणून राखीव जागा मिळणार आहे. तसेच मादेणशी क्रिडा संकुलद्वारे ह्यावर्षीही '' समर कॅम्प'' चे आयोजन करण्यात आले आहे.

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ प्रशिक्षण केंद्र :-

माणदेशी फौंडेशन यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र सन २०११-१२ मध्ये चालू केले. पूर्वतयारी अभ्यासक्रमामध्ये पहिल्याच वर्षी एकूण ६५ विद्यार्थी बसले होते त्यामध्ये महिलांचा जास्त सहभाग होता ९९ टक्के निकाल लागला. सौ. सुमन वसव गोंदावले, सौ. उर्मिला भोसले पानवन, व बापूसो नामदास विरकरवाडी यांनी ८३% मार्क घेवून प्रथम क्रमांक मिळवीला. विद्यार्थ्यांसाठी एकूण ६ समंत्रम (उच्च शिक्षित शिक्षक) असून म्हसवड व दहिवडी येथे अभ्यासक्रमवर्ग घेतले जातात.

पुरस्कार :-

श्रीमती चेतना सिन्हा यांना माणदेशासारख्या दुष्काळी प्रदेशातील पिडीत, उपेक्षित, कष्टकरी महिलांसाठी ग्रामीण महिला बँक, व्यवसाय शाळा, फिरती व्यवसाय शाळा रेडिओ स्टेशन, ग्रामीण मुला-मुलींसाठी माणदेशी चॅम्पियन क्रिडा संकुल सुरु करून उल्लेखनिय कार्याबद्दल रोटरी क्लब ऑफ पुना मिडटाऊन यांच्यातर्फे गौरविण्यात आले. तसेच सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल '' सहकार भारती पुणे महानगर '' पुणे, श्रीमती हिराबेन नानावती इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड रिसर्च फॉर वुमन, पुणे तसेच ''सकाळ '' सातारा तर्फे श्रीमती चेतना सिन्हा यांना गौरवचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले.

आर्थिक उलाढाल :-

आज माणदेशी महिलांचा प्रचंड विश्वास ही माणदेशी महिला सहकारी बँकेची खरी ठेव आहे. २०११-१२ या आर्थिक वर्षात बँकेच्या या महिलांनी ४० कोटी ३२ हजार रुपयाच्या ठेवी माणदेशी बँकेत ठेवल्या आहेत. गेल्या वर्षाच्या तुलनेत ठेवीत १९.८३% नी वाढ झाली आहे. २६ कोटी ४१ लाख ८३ हजार रुपयाचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. कर्ज वाटपात १७.८९% नी वाढ झाली आहे. एनपीए चे प्रमाण केवळ २.२९% या वर्षीचा ढोबळ नफा ५२ लाख ११ हजार रुपये झाला आहे. गेल्या वर्षाच्या नफ्याच्या तुलनेत ३२.५३% ने वाढ झाली आहे. बॅकेचे भागभांडवल २ कोटी ७६ लाख ५४ हजार आहे. बँकेचे खेळते भांडवल ४४ कोटी ९१ लाख ३१ हजार आहे.

माणदेशी इंटरनशिप प्रोग्रॅम :-

आतापर्यंत येल युनिव्हर्सिटी, पोर्टलॅण्ड युनिव्हसिटी, हार्वड साईज, कोलंबिया, मिचीगन, बर्कले युनिव्हर्सिटी, डोएच बँक अशा विविध युनिव्हर्सिटीद्वारे १०० विद्यार्थ्यांनी येवून माणदेशीच्या उपक्रमांवर अभ्यास केलेला आहे. २०११-१२ मध्ये इमिलिया गॅलिनो इटली, मार्सल तावेलिनी ब्राझिल, निकीता महेश्वरी सॅन फ्रान्सिस्को, नदजा अतामुनिक, अॅना हमपर्ट जर्मनी, लुका हेन्ड्रिच युएस, ब्रिटनी ग्राफ युएस, कॅरॉल वेंगनार, स्वित्झरलॅन्ड, डीना युनुस जर्मनी, क्रिस्टोफ रोहयोस जर्मनी, एमली टोर्नकी, युएस या ११ परदेशी विद्यार्थ्यांनी माणदेशीस भेट देवून कार्याचा अभ्यास केला.

१५ वा वार्षिक अहवाल सन २०११-१२

भागभांडवल :-

बँकेचे अधिकृत भागभांडवल रु. ५ कोटीचे आहे. वर्ष अखेरीस रु. २७६५३५२५/- एवढे जमा झाले आहे. या वर्षात भागभांडवलात रु. १६४७७७५ इतकी वाढ झालेली असून ही वाढ ०६.३४ % एवढी आहे. वर्षाअखेर एकूण १५४३ नवीन सभासद झाले तसेच मृत्यू राजीनामा इत्यादीमुळे ११९४ सभासद कमी झाले. त्यामुळे वर्षाअखेर एकूण सभासद संख्या १२२२० झाली आहे.

गंगाजळी व निधी :-

मागील वर्षाअखेर गंगाजळीसह इतर निधी रु. ४१५३९२०.७९ होती अहवाल वर्षात त्यात रु. १४९५९२५.०७ ने वाढ होऊन अहवालवर्षा अखेर गंगाजळी, थकव्याज निधी, राखीव निधीची रक्कम रु. ५६४९८४५.८६ इतकी झाली आहे. या वर्षात वाढीचे शेकडा प्रमाण ३६.०१ % इतके आहे.

ठेवी व विमा संरक्षण :-

मार्च २०११ च्या ठेवी रु. ३३३८२४७०५.२९ लाखावरुन मार्च २०१२ अखेर रु. ४०००३२१३८.८९ एवढ्या झाल्या आहेत ही वाढ रु. ६६२०७४३३.६० इतकी असून, ठेव वाढीचे प्रमाण १९.८३% आहे. या वाढत्या व बदलत्या स्पर्धेत ठेव वाढी बरोबर नफा क्षमता वाढविणे हे ही महत्वाचे आहे त्यामुळे ठेवीच्या व्याजावरील खर्चाचे प्रमाण विचारात घेता ठेवीवरील व्याज दर कमी करावे लागले तरीही आपण एवढ्या ठेवी गोळा केल्या. सभासदांचा,ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास स्पष्ट आहे सर्व ठेवी डिपॉझिट इन्श्युरन्स आणि क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन अंतर्गत सुरक्षित आहेत. त्यांची दर सहामाही विम्याच्या हप्त्याची रक्कम बँक भरते.

कर्ज :-

गतवर्षी येणे कर्ज रु.२२४०९८७४३.६७ इतके होते या वर्षी त्या मध्ये रु.४००८३८८८.५० लाख एवढ्या रकमेची वाढ झालेली आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या परिपत्रकाप्रमाणे योग्य तारणी कर्ज वाटपाबद्दल केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे कर्जवाटप करणे आवश्यक असलेने,चालू वर्षात आम्ही कर्ज प्रकारात वाढ करुन नविन कल्पना आपल्यापुढे ठेवणार आहोत, स्थानिक लोकांना कर्ज उपलब्ध करुन देण्याची योजना राबविणार आहोत, बँकेचे ठेवीदारांशी, खातेदारांशी, कर्जदारांशी नेहमी सलोख्याचे संबंध असावेत म्हणुन त्यात आम्ही नेहमी भर घालतो.

अग्रक्रम क्षेत्रात कर्ज :-

भारतीय रिझर्व बँक धोरणाप्रमाणे एकूण कर्जाच्या ६०% कर्ज अग्रक्रम क्षेत्रास असावे. आपल्या बँकेत २०११-२०१२ सालात सुद्धा अग्रक्रम क्षेत्रास ९२.८३% कर्जवाटप केलेले आहे. ही आपली अभिमानाची बाब आहे. तसेच दुर्बल घटकांना सुद्धा ८९.८७% कर्जवाटप केले आहे.

थकबाकी व कर्जवसुली :-

बँकेच्या आर्थिक उन्नतीमध्ये कर्जवाटप व त्यावरील व्याजाची व हप्त्यांची परिणामकारक वसुलीचा फार मोठा वाटा आहे. त्या दृष्टिने बँकेने सतत पाठपुरवठा केल्यामुळे अहवाल वर्षात थकबाकी चे प्रमाण नियंत्रीत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे थकबाकीचे प्रमाण ३.७६% इतके आहे व वसुली ९६.२४% झाली आहे. व NPA २.२९% आहे.

संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :-

एकाही संचालकाकडे बँकेचे कर्ज नाही.

नफा वाटणी :-

या वर्षाच्या नफ्याची वाटणी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे.

चालू सालचा नफा रु.		३१३८४८८.६०
राखीव निधी	२५%	७८४६२२.१५
इमारत निधी	५०%	१५६९२४४.३०
संशयीत बुडीत कर्ज निधी	२५%	७८४६२२.१५
एकूण	१०० %	३१३८४८८.६०

शाखा विस्तार :-

बँकेला सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, पुणे, कोल्हापूर व रायगड या सात जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्राची मान्यता मिळालेली आहे. भविष्यात बँक या सात जिल्ह्यांत शाखांचे विस्तारीकरण करणार आहे. बँक शाखा विस्तारासाठी RBI ला प्रस्ताव पाठविणार आहे.

सभासदांची वर्गवारी:-

महाराष्ट्रातील मागासवर्गीय महिलांना एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देणारी आपली पहिलीच महिला बँक आहे.

१) मागासवर्गीय - २५%   २) ओ.बी.सी. - २४%
३) एन्. टी. २८%   ४) ओपन - २३%

प्रशिक्षण कार्यक्रम :-

दरवर्षी प्रमाणे सन २०११ -१२ मध्ये देखील माणदेशी बँकेद्वारे कर्मचाऱ्यांना कर्ज वसुली, गट कर्ज वाटप, कॅशियर, वीजबिल स्विकृती योजना संदर्भात संगणकीय प्रशिक्षण, बँकिंग सॉफ्टवेअर संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले.

गुंतवणूक:-

बँकेने दि. ३१/३/२०१२ या वर्षात रु. १२९१३२६५५.०० इतकी गुंतवणूक केलेली आहे. सरकारी रोखेमध्ये गुंतवणूक ८२६४९१७८.०० व इतर बँकेमध्ये ४६४८३४७७.०० गुंतवणूक केलेली आहे.

सोनेतारण कर्ज :-

बँकेने दि. ११/८/१९९७ पासून सोनेतारण कर्ज योजना बँकेच्या सर्व शाखांमध्ये सुरु केलेली असून सदर योजनेतून एकूण ३९५ लाख १४ हजार रुपये इतके कर्जवाटप करणेत आले आहे.

अंतर्गत तपासणी -

बँकेचे ३१/३/२०१२ अखेर संपणाऱ्या सहकारी वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षण मे. जाधव तानाजीराव आणि कं. चार्टर्ड अकौटंटस् ,कराड व पी. एम. बेकनाळकर आणि कं. चार्टर्ड अकौटंट, कोल्हापूर यांनी केले असुन त्यांनी बॅंस बहुमोल सुचना व मार्गदर्शन केले आहे.

अभिनंदन-

मा.श्री. गुलाबराव पोळ यांची पुणे पोलीस आयुक्त पदी निवड झालेबद्दल त्यांचे माणदेशी परिवारा तर्फे हार्दीक अभिनंदन!

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेमध्ये सहाय्यक विक्रिकर आयुक्त पदी निवड झालेबद्दल कु. पुनम ओंबासे, वडगांव तसेच असिस्टंट कमिशनर ऑफ पोलिस या पदावर महाराष्ट्रात मुलींमध्ये कु. प्रेरणा जिवन कट्टे, गोंदवले बु ।। यांची निवड झाली यांना मिळालेल्या यशाबद्दल माणदेशी परिवारातर्फे हार्दीक अभिनदंन !

लेखापरीक्षण अहवाल

(बँकिंग रेग्युलेशन अॅक्ट कलम ३०, महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम ८१
(५-ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

आम्ही *माणदेशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड* या बँकेच्या सोबत जोडलेल्या दिनांक ३१।०३।२०१२ च्या ताळेबंदाचे व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाचा नफा / तोटा पत्रकाचे लेखापरिक्षण केले आहे. ही दोन्ही आर्थिक पत्रके बनविण्याची जबाबदारी त्या संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. आमची जबाबदारी ही आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे त्या आर्थीक पत्रकांवर मत नोंदविण्याचे आहे.

आम्ही आमचे लेखापरिक्षण भारतात सर्वमान्य असलेल्या आडीटिंग स्टॅण्डर्डस्‌ना अनुसरुन केले आहे. त्या स्टॅण्डर्डस् नुसार आम्ही आमचे लेखापरिक्षणाचे नियोजन व प्रत्यक्ष लेखापरिक्षण अशा पद्धतीने करणे अपेक्षित आहे की जेणेकरुन त्या आर्थिक पत्रकांमध्ये गंभीर स्वरुपाच्या चुका नाहीत, याची रास्त खात्री करुन घेतली पाहिजे. आर्थिक पत्रकांमधील रक्कमांच्या संदर्भातील व इतर माहितीच्या संदर्भातील पुरावे नमुना तत्वांवर तपासण्याचा अंतर्भाव लेखापरिक्षणामध्ये होतो. तसेच व्यवस्थापनाने वापरलेल्या अकौटिंग तत्वांची तपासणी करणे. व्यवस्थापनाने केलेल्या महत्वाच्या आर्थिक अंदाजांची तपासणी करणे व आर्थिक पत्रकांच्या सादरीकरणाचे मूल्यमापन करणे याचा सुद्धा समावेश लेखापरिक्षणामध्ये होतो. आमचा विश्वास असा आहे की, आमचे लेखापरिक्षण आम्हाला मते बनविण्यासाठी यथार्थ आधार मिळवून देते.

आम्ही अहवाल करतो की,

१) आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पात्तीस येईल, त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्या खालील नियम व संस्थेने पोटनियमांन्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवलेली आहेत.

३) आम्ही तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकाशी व विवरणाशी जुळत आहे.

४) आमच्या मते आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरुन हे हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहीती देतात. तसेच सोबत जोडलेल्या परिशिष्ट आणि आमच्या लेखापरिक्षण अहवालातील भाग 'अ', 'ब' आणि 'क' मधील मुद्द्यानां अनुसरुन-

अ) ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१।०३।२०१२ ची बँकेच्या आर्थिक परिस्थीतीची आणि

ब) नफा/तोटा पत्रकाच्या बाबतीत या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या मुदतीत बँकेच्या नफ्याची सत्य व रास्त स्थितीची.

५) सहकारी वर्ष २०११-२०१२ करीता संस्थेस वर्ग 'अ' देण्यात आलेला आहे.

स्थळ : सातारा
दिनांक : २७ जुन २०१२

एस. आर. चौरसिया आणि कं.
चार्टर्ड अकौटंट करीता

बँकेची वैशिष्ट्ये

१. व्यापारी बँकापेक्षा ठेवीवर अर्धा टक्का अधिक व्याज.
२. स्थानिक नेतृत्व आणि व्यवस्थापन
३. व्यक्तीगत जिव्हाळा आणि तत्पर व घरपोच सेवा.
४. ग्रामीण गावातील सभासदांना एजंटची सोय
५. रुपये १ लाख पर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण
६. जेष्ठ नागरीकांच्या ठेवीवर १% अधिक व्याज
७. वीजबीले स्विकारण्याची सोय
८. महिलांसाठी UTI पेन्शन योजना

ठेवीचे व्याजदर

सेव्हिंग्ज ठेव ४%	२७५ दिवस ते २ वर्ष ९.२५%
१५ दिवस ते ४५ दिवस ७%	२ वर्ष ते ५ वर्ष १०%
४६ दिवस ते ९० दिवस ८%	दामदिडपट ठेव-४ वर्षे २ महिने १६ दिवस
९१ दिवस ते १८० दिवस ७%	दामदुप्पट ठेव -७ वर्षे २ महिने ११ दिवस
१८१ दिवस ते २७४ दिवस ९.५%	५ वर्षाच्या पुढे - ९%

जेष्ठ नागरिक / पतसंस्था १% जादा व्याजदर

बँकेचा शाखा विस्तार

शाखा म्हसवड फोन: (०२१७३) २७०११९
शाखा गोंदावले बु।। फोन: (०२१६५) २५८०१४
शाखा वडूज फोन: (०२१६१) २३२४७०
शाखा दहिवडी फोन: (०२१६५) २२०३८०
शाखा सातारा फोन: (०२१६२) २३८५२२
शाखा लोणंद फोन: (०२१६९) २२६०९०

● शाखा म्हसवड येथे लॉकर सुविधा उपलब्ध आहे. ●

* बँकर्स *

दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑप बँक लि. मुबंई
सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. सातारा
एच.एस.बी.सी.मुंबई
एच.डी.एफ.सी.बँक शाखा पुणे
बँक ऑफ महाराष्ट्र शाखा-म्हसवड, गोंदवले बु।।
बँक ऑफ इंडिया शाखा - बुध
आ.डी.बी.आय म्हसवड, राणंद
आय.सी.आय.सी.आय.सांगली
बँक ऑफ बडोदा, दहिवडी
एस. बी.आय. वडुज, ॲक्सीस बँक शाखा-सातारा

अंतर्गत लेखापरिक्षक

मे. जाधव तानाजीराव आणि कंपनी
श्री. जाधव तानाजीराव बाबूराव
चार्टर्ड अकौंटंटस् अंतर्गत लेखा परिक्षक, कराड
पी. एम. बेकनाळकर ॲण्ड कंपनी,
चार्टर्ड अकौटंट, कोल्हापूर

सरकारी लेखापरिक्षक

एस. आर. चौरसिया ॲन्ड कंपनी
चार्टर्ड अकोटंटस्, सातारा

कायदेशीर सल्लागार

ॲड. काझी एन. एच. (म्हसवड)
ॲड. माने एस. एम. (म्हसवड)

परिशिष्ठ अ

बँकेचे नांव :- माणदेशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड

मुख्य कार्यालयाचा पत्ता :- मु. पो. म्हसवड ता. माण जि. सातारा पिन नं. ४१५५०९

नोंदणी तारीख व नोंदणी क्रमांक :- एस. ए. टी./ एम.ए.एन./बी.एन.के./ओ/११९/सन १९९६ दि. ३१/१०/१९९६

रिझर्व बँक परवाना नंबर तारीख :- एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी,२७/१/१९९७

कार्यक्षेत्र :- सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, रायगड, पुणे,कोल्हापूर जिल्हा

तपशील ३१/३/२०१२		रक्कम
मुख्य कार्यालय	म्हसवड	
सभासद	I) अ वर्ग	१२२२०
	II) ब वर्ग	२३२७
वसुल भागभांडवल		२७६५३५२५.००
एकूण राखीव व इतर निधी		५४११०१५.८६
ठेवी	I) बचत ठेव	८७२२३८७९.४०
	II) चालू ठेव	१३३५०६७.९६
	III) मुदत व इतर ठेवी	३११४७३१९१.५३
दिलेली कर्ज	I) सुरक्षीत	२६२२४८७३४.४७
	II) असुरक्षीत	१९३३८९७.७०
	एकूण टक्केवारी अग्रक्रम क्षेत्रासाठी	९२.८३%
	एकूण टक्केवारी दुर्बल घटकासाठी दिलेली कर्ज	८९.८७%
गुंतवणूक	दि. सातारा जिल्हा मध्य.सह.बँक लि.सातारा, स्टेट बँक ऑफ इंडिया, आय.डी.बी.आय व इतर बँक	
	मुदत ठेव	४५९३२९७७.००
	सरकारी कर्ज रोखे	८२६४११७८.००
	DCC शेअर्स	५००.००
थकबाकी		३.७६%
NPA		२.२९%
ऑडीटवर्ग		'अ'
वार्षिक नफा		३१३८४८८.६०
एकूण कर्मचारी	अधिकारी - १८	
	लिपीक - १५	
	शिपाई - ७	
शाखा	शाखा - ६	
	विस्तारीत कक्ष - ०	
खेळते भांडवल		४४११३११०४.१५

रिझर्व्ह बँक परिपत्रकानुसार दर्शविणेची माहिती

अ. नं.	तपशिल	३१/०३/११	३१/०३/१२
१	स्वनिधी परिपूर्णता प्रमाणक (सी. आर. ए. आर.)	१८.४६%	१७.५४%
२	ढोबळ एन. पी. ए. कर्ज रक्कम	८९.७१	९८.१७
३	ढोबळ एन. पी. ए. कर्ज एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण	४.००%	३.७२%
४	निव्वळ एन. पी. ए. कर्ज रक्कम	६३.५९	५९.५१
५	निव्वळ एन. पी. ए. कर्जाशी शेकडा प्रमाण	२.७१%	२.२९%
६	१) एन. पी. ए. तरतूद	२६.१२	३८.६६
	२) नियमीत कर्जाबाबत तरतूद	८.५९	८.६०
७	सरकारी रोखे गुंतवणूकीची रक्कम	६३५.५४	८२६.४९
८	निव्वळ नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण	०.५९%	०.७९%
९	इतर उत्पन्नाचे सरासरी खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण	०.२७%	०.११%
१०	व्याज उत्पन्नाचे सरासरी खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण	११.८५%	१३.२६%
११	व्यवस्थापकीय खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	३.७६%	२.५६%
१२	१) प्रती सेवक व्यवसाय	२७८.९६	१६६.०५
	२) प्रती सेवक नफा	०.९१	०.७८
१३	सरकारी रोखे गुंतवणूकीचे एन. डी. टी. एल. शी प्रमाण	२५.२३%	२७.९३%
१४	सरासरी येणे कर्जाचे सरासरी ठेवीशी शेकडा प्रमाण	६९.७३%	७६.९९%
१५	संचालकांकडील येणे कर्जाचे एकुण येणे कर्जाशी शेकडा प्रमाण	---	---
१६	ठेव विमा हप्ता	२.७०	३.२९
१७	अतिरिक्त परिशिष्ट(गुंतवणूक)		
	अ) नॉन एस. एल. आर. गुंतवणलकीचा तपशील	३०.६३	२२९.७१
	१) राष्ट्रीयकृत बँका	२३.५२	२२४.००
	२) अन्य	७.११	५.७१

'एन' नमुना

ताळेबंद पत्रक

रक्कम ३१/०३/२०११	भांडवल व देणी	रक्कम ३१।३।२०१२	रक्कम ३१।०३।२०१२
५००००००००.००	अधिकृत भागभांडवल २५ चे ३०७१०० व		५००००००००.००
	१०० चे ४२३२२५ भाग या प्रमाणे ५००००० भाग		
	भागभांडवल		
२६००५७५०.००	१) व्यक्तिगत	२७६५३५२५.००	२७६५३५२५.००
७६२५३३८.००	इतर निधी		
	१) राखीव निधी	२७८३१६१.२७	
	२) इमारत निधी	२७००२४९.५९	
	३) लाभांश स. निधी	१५६८५.००	
	४) संशयित बुडीत कर्ज निधी तरतूद	३८६५८९२.२३	
	५) गुंतवणूक चढउतार निधी	१५०७५०.००	
	६) स्टँडर्ड असेट तरतूद	८५९५००.००	१०३७५२३८.०९
३३३८२४७०५.२९	ठेवी		
	मुदत ठेवी		
	व्यक्तीगत ठेवी		
	१) व्यक्तिगत मुदत ठेवी	१०९८७२८१०.००	
	२) व्यक्तिगत दामदुप्पट ठेवी	३०४९११२१.००	
	३) व्यक्तिगत दामदिडपट ठेवी	५५७४४५७.००	
	४) व्यक्तिगत दामतिप्पट ठेवी	२०७१८०९७.००	
	५) व्यक्तिगत दामचौप्पट ठेवी	५४९८६७.००	
	६) रिकरींग ठेव	८९४२४१४.००	
	७) पुनर्गुंतवणूक ठेव	१९६५९९१६.००	
	८) माणदेशी बचत ठेव	२२८४८९५.००	
	९) महिला समृद्धी ठेव	१८५००४६.००	
	१०) महिला स्फुर्ती	२०२६५.६०	
	११) महिला साप्ताहिक ठेव	३३२५.००	
	१२) धनवर्धीनी ठेव	४९३८३७.००	
	१३) माणदेशी दशपुर्ती ठेव	६३१६९२०.००	
	१४) सावित्रीबाई फुले बचत ठेव	५२१५०.००	
	१५) सिता बचत ठेव	२२६८२.९३	
	१६) सामाजीक सुरक्षा ठेवी	३६५६३३.००	

दि. ३१।३।२०१२ अखेर

रक्कम ३१/०३/२०११	जिंदगी व येणी	रक्कम ३१।३।२०१२	रक्कम ३१।०३।२०१२
१५३४८९९९.००	हातावरील शिल्लक	२१७३७३८३.००	२१७३७३८३.००
३७५६४३९६.७५	**बँकेतील शिल्लक**		
	एम.एस.सी. आणि जिल्हा मध्य. बँक		
	१) एम.एस.सी.बँक चालु ठेव खाते मुंबई	३१००१.९०	
	२) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-म्हसवड	७२४७१५६.९५	
	३) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-वडुज	३२५६४७२.००	
	४) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-गोंदावले	८२३०६२.६१	
	५) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-दहिवडी	२३१२५५९.१६	
	६) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-पिलीव	७०१२०.००	
	७) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-लोंणद	२०४४८६०.००	
	८) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-मलवडी	३०००.००	
	९) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-सातारा	१५७९९०५.८१	
	१०) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-पुसेगांव	४०२११६.००	
	११) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-पुसेसावळी	१४७३.००	
	१२) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-पनवेल	६०८५.९४	
	राष्ट्रीयकृत बँका		
	१) बँक ऑफ इंडिया चालु ठेव खाते शाखा-बुध	३२१४९८.६४	
	२) स्टेट बँक ऑफ इंडिया चालु ठेव खाते शाखा-वडुज	६०५०३.७६	
	३) बँक ऑफ महाराष्ट्र चालु ठेव खाते शाखा-म्हसवड	८३२१७.३५	
	४) बँक ऑफ महाराष्ट्र चालु ठेव खाते शाखा-गोंदावले	२६१३१०.३०	
	५) बँक ऑफ बडोदा चालु ठेव खाते शाखा-दहिवडी	६०२९९१.००	
	६) आय.डी.बी.आय बँक चालु ठेव खाते शाखा-म्हसवड	९५९२३७.८८	
	७) आय.डी.बी.आय बँक चालु ठेव खाते शाखा-रांणद	२२७१३३.००	
	८) आय.डी.बी.आय बँक चालु ठेव खाते शाखा-सोलापूर	९९६६६.००	
	९)आय.डी.बी.आय.बँक चालु ठेव खाते शाखा-कळंबोली	१३२३७.४१	
	१०) आय.डी.बी.आय बँक चालु ठेव खाते शाखा-लोणंद	५८५८५५.००	
	व्यापारी बँका		
	१) आय.सी.आय.बँक चालु ठेव खाते शाखा-सांगली	४०७८.९९	
	२) एच.डी.एफ.सी. बँक चालु ठेव खाते शाखा-पुणे	१७७१५.७०	
	३) एच.एस.बी.सी.बँक चालु ठेव खाते शाखा-मुंबई	२९३९६.८०	
	४) ॲक्सेस बँक चालु ठेव खाते शाखा-सातारा	१९१२५०.७३	
	५) ॲक्सेस बँक चालु ठेव खाते शाखा-सातारा	५११७३७९.०५	२१७५२२८४.९८
८३५६०७३१.००	**गुंतवणूक**		
६३५५३७५३.००	सरकारी रोखे		
	१) केंद्र सरकारी रोखे (Central Government Sec.)	६४६४८८४७.००	
	२) राज्य सरकारी रोखे (State Government Sec.)	१८०००३३१.००	८२६४९१७८.००
५००.००	जि.मध्य. सह बँक शेअर्स	५००.००	५००.००

'एन' नमुना

ताळेबंद पत्रक

रक्कम ३१/०३/२०११	भांडवल व देणी	रक्कम ३१।३।२०१२	रक्कम ३१।०३।२०१२
८८८२१३३६.००	संस्था ठेवी		
	१) संस्था मुदत ठेवी	८३२५११९६७.००	
	२) संस्था दामदुप्पट ठेवी	०.००	
	३) संस्था दामदिडपट ठेवी	४३९११८८.००	
६८३७१२२८.३३	सेव्हिंग्ज ठेव	८७२२३८७९.४०	
११२०८६२.१९	चालु ठेव	१३३५०६७.९६	४०००३२१३८.८९
२७७६९.६३	ओ.बी.सी.	१३१५०५१.००	१३१५०५१.००
०.००	बाहेरील कर्ज(जि.मध्य.सह.बँक ओ.डी.)	८३१.७५	८३१.७५
३८२१७०९.४१	मुदतठेवीवरील देणे व्याज	७६४४६६८.८२	७६४४६६८.८२
५८९३६३०.००	इतर देणी		
	१) ऑडिट फी देणे	२४५३३७.००	
	२) शिक्षण निधी देणे	१००००.००	
	३) थकव्याज एन.पी.ए.	३५९४४२६.००	
	४) टी.डी. एस. देणे	२१७०१.००	
	५) शेती कर्ज देणे	२१६००००.००	
	६) व्यवसाय कर देणे	९१७५.००	६०४०६३९.००
१८१५९००.०९	नफा/ तोटा खाते	३१३८४८८.६०	३१३८४८८.६०

दि. ३१।३।२०१२ अखेर

रक्कम ३१/०३/२०११	जिंदगी व येणी	रक्कम ३१।३।२०१२	रक्कम ३१।०३।२०१२
२०००६४७८.००	**बँकेतील मुदत ठेवी**		
	एम.एस.सी. आणि जिल्हा मध्य. बँक	२३५११५२५.००	
	राष्ट्रीयकृत बँका		
	१) स्टेट बँक ऑफ इंडिया मुदत ठेव खाते शाखा-वडुज	२४०००००.००	
	२) आय.डी.बी.आय बँक मुदत ठेव खाते शाखा-रांणद	२००००००.००	
	शेडुल्ड बँका		
	१) कराड अर्बन बँक मुदत ठेव शाखा-वडुज	२१४५२.००	४५९३२९७७.००
	कर्जे		
७९४६२६०.५०	अल्प मुदत कर्जे		
	१) कॅश क्रेडीट कर्जे	१०६९२१८२.००	
८६४५४११०.३५	मध्यम मुदत कर्जे		
	१) हायपरचेस कर्ज	२९४५८५२०.००	
	२) सामान्य कर्ज	२८१२०६९५.१५	
	३) गृहउपयोगी कर्ज	२३११५९.००	
	४) महिला उत्कर्ष कर्ज	१२६१५०.००	
	५) मध्यम मुदत कर्ज	१६५७११८४.५०	
	६) रिफायनान्स कर्ज	१२१७३७४.७०	
	७) माणदेशी नॅनो कर्ज	७१६५२३.००	
	८) सुवर्ण कर्ज योजना	०.००	
	९) माणदेशी प्रगती कर्ज	२४२८३२५.००	
५८८७६९१२.००	ठेव तारण कर्जे		
	१) मुदत ठेव तारण कर्ज	९०३३६३७.००	
	२) दामदिडपट तारण कर्ज	४५४१६१.००	
	३) दामदुप्पट तारण कर्ज	५४१७४३७.००	
	४) रिकरींग ठेव तारण कर्ज	८१७३६८.००	
	५) माणदेशी बचत ठेव तारण कर्ज	८८८६१२.००	
	६) महिला समृद्धी ठेव तारण कर्ज	६१११४.००	
	७) पुनर्गुंतवणूक ठेव तारण कर्ज	३१७७१८४.००	
	८) धनवर्धीनी ठेव तारण कर्ज	६९२९११.००	
	९) दामचौप्पट ठेव तारण कर्ज	८२४७९.००	
	१०) दामतिप्पट ठेव तारण कर्ज	७९८१०७.००	
	११) संस्था ओ.डी.	१५८२९१५६.००	
	१२) व्यक्ती ओ. डी.	३११५४४९.००	
	१३) सोनतारण कर्ज	३९५१४३३०.००	
	१४) राष्ट्रीय बचत पत्र तारण कर्ज	१०३१६८२.००	
	१५) संस्था ठेव तारण कर्ज	११००६९३.००	

'एन' नमुना

ताळेबंद पत्रक

रक्कम ३१/०३/२०११	भांडवल व देणी	रक्कम ३१।३।२०१२	रक्कम ३१।०३।२०१२
३७९०१४८०२.४२	एकूण	४५६२००५८१.१५	४५६२००५८१.१५

लेखापरिक्षण अहवालातील शेऱ्यासपात्र राहून बरोबर आहे.

सरकारी लेखापरिक्षक

एस. आर. चौरसिया ॲन्ड कंपनी

चार्टर्ड अकौटंटस् सातारा

दि. ३१।३।२०१२ अखेर

रक्कम ३१/०३/२०११	जिंदगी व येणी	रक्कम ३१।३।२०१२	रक्कम ३१।०३।२०१२
७०८२१४२०.८२	दिर्घ मुदत कर्ज		
	१) हौसिंग कर्ज	३५०३९६४.००	
	२) दिर्घ मुदत कर्ज	८८३०१४३४.८२	२६४१८२६३२.१७
८७२५४०२.००	येणे व्याज		
	१) येणे व्याज एन.पी.ए.	३५९४४२६.००	
	२) येणे व्याज (कर्ज वरील)	५११५७१२.००	
	३) येणे व्याज (बँक मुदत ठेवीवरील)	१०३९८०.००	
	४) येणे व्याज (सरकारी रोख्यावरील)	१३५४१०९.००	१०२४८२२७.००
२७७६९.६३	ओ.बी.आर.	१३१५०५११.००	१३१५०५११.००
१५९१३१.३७	शाखा मिळवणी	२२९६३५.००	२२९६३५.००
५३१२२१२.००	डेडस्टॉक		
	१) फर्निचर डेडस्टॉक	१६५११५८५.००	
	२) इलेक्ट्रीक डेडस्टॉक	१०७६४१२.००	
	३) सजावट डेडस्टॉक	३१०११.००	
	४) कॉम्प्युटर डेडस्टॉक	१४५६७०४.००	
	५) लॉकर डेडस्टॉक	५६३९५०.००	
	६) मोटारसायकल डेडस्टॉक	१८५९५७.००	४९६५६२७.००
४२१७४१७.००	डिपॉझिट		
	१) टेलिफोन डिपॉझिट	८९८४.००	
	२) इलेक्ट्रीक डिपॉझिट	१८३०५.००	
	३) नळ कनेक्शन डिपॉझिट	७५०.००	
	४) शिल्लक स्टेशनरी	३३४१२७.००	
	५) निवडणुक अनामत	८४९२०.००	
	६) एम.एस.ई.बी.बिल कलेक्शन(डिपॉझिट)	५५००००.००	
	७) ॲडव्हान्स	३००००.००	
	८) शासन येणे	२१६००००.००	३१८७०८६.००
३७९०१४८०२.४२	एकूण	४५६२००५८१.१५	४५६२००५८१.१५

सौ. रेखा सु. कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी

सौ. निर्मला म. मोरे
उपाध्यक्षा

सौ. चेतना वि. सिन्हा
अध्यक्षा

सर्व संचालक मंडळ

'एन' नमुना

नफा-तोटा पत्रक

रक्कम ३१/०३/२०११	खर्च	रक्कम ३१।०३।२०१२	रक्कम ३१।०३।२०१२
२११०४०२७.१३	१) व्याज दिले		
	१) व्याज दिले ठेवीवरील	२९६७६३६६.९१	
	२) व्याज दिले कर्जावरील	०.००	
	३) व्याज दिले बँक ओ.डी. वरील	३१०४३०.००	२९९८६७९६.९१
४३७१५७८.५०	२) पगार खर्च		
	कर्मचारी पगार	३३१९११८.००	
	कर्मचारी भत्ता	३०१७०.००	
	कर्मचारी भविष्य निर्वाह निधी	१८७०१८.००	
	भविष्य निर्वाह निधी प्रशासकीय खर्च	२४९८८.००	
	कर्मचारी प्रवास भत्ता	२२४२४.००	
	हंगामी सेवक पगार	९५८६८७.००	
	कर्मचारी बोनस	१३६८२५.००	
	कर्मचारी विमा	७०७८८.००	
	कर्मचारी प्रशिक्षण	२०३४.००	४७५२०५२.००
९७११२.००	३) संचालक मिंटींग खर्च		
	संचालक मिंटींग भत्ता	८४७००.००	
	संचालक प्रवास भत्ता	५५४६.००	९०२४६.००
१२८८७०२.००	४) कर भाडे विमा		
	ऑफिस भाडे	५४१२००.००	
	ऑफिस घरपट्टी व पाणीपट्टी	७०१२६.००	
	विमा खर्च	४४६५२३.००	
	लाईट बिल खर्च	२७४९९०.००	
	वाहन कर	१४१३०.००	
	इलेक्ट्रीक खर्च	३५९६६.००	१३८२९३५.००
१००००.००	५) कायदेशीर खर्च		
	शिक्षण निधी खर्च	१००००.००	१००००.००
२७८१६६.९१	६) टेलिफोन व पोस्टेज खर्च		
	पोस्टेज खर्च	२०९२५.००	
	टेलिफोन खर्च	२७३६३६.००	२९४५६१.००
३१९०९४.००	७) ऑडीट फि	१६९७८७.००	१६९७८७.००
१५२६३७२.००	डेडस्टॉक दुरुस्ती व घसारा		
	घसारा खर्च	१०४३१६३.००	
	डेडस्टॉक दुरुस्ती खर्च	१४८७०.००	
	कॉम्प्युटर दुरुस्ती खर्च	९६५००.००	
	हार्डवेअर आणि सॉप्टवेअर खर्च	२४३५९८.००	१३९८१३१.००

दि. १।४।२०११ ते ३१।३।२०१२ अखेर

रक्कम ३१/०३/२०११	उत्पन्न	रक्कम ३१।०३।२०१२	रक्कम ३१।०३।२०१२
३६६१४९३५.८२	१) व्याज आले		
	१) व्याज आले कर्जावरील	३९४०४८०८.६२	
	२) व्याज आले सरकारी रोख्यावरील	५४२४०५६.२४	
	३) व्याज आले गुंतवणुकीवरील	१५२०९२६.००	४६३४९७९०.८६
१४९६७५.२३	२) कमिशन		
	कमिशन	१९६०१३.००	१९६०१३.००
६९६२३३.००	३) इतर उत्पन्न		
	लॉकर भाडे	१३७४०.००	
	लांभाश	५०.००	
	इतर उत्पन्न	१५०८६३.७०	१६४६५३.७०

'एन' नमुना

नफा-तोटा पत्रक

रक्कम ३१/०३/२०११	खर्च	रक्कम ३१।०३।२०१२	रक्कम ३१।०३।२०१२
३०७२०४.१२	९) प्रिंटीग स्टेशनरी खर्च		
	स्टेशनरी खर्च	३२१५०७.००	
	कॉम्प्युटर स्टेशनरी खर्च	९१७८.००	
	चेक बुक चार्जेस खर्च	३५०.००	३३१०३५.००
३४२६९८८.३०	१०) इतर खर्च		
	पिग्मी कमिशन	२३४२३८९.९५	
	मिटींग खर्च	०.००	
	सल्लागार फि	११३०००.००	
	प्रवास खर्च	१७३३७८.००	
	वार्षिक अहवाल खर्च	३८३३७.००	
	वार्षिक मिटींग खर्च	२५०९७.००	
	सर्व्हिस चार्जेस	३५४५४.७०	
	आदरतिथ्य खर्च	६३३५८.००	
	सणसुद खर्च	७२८२३.००	
	सजावट खर्च	१५२२४.००	
	निवडणुक खर्च	१६०००.००	
	सॉप्टवेअर खर्च	१०५०.००	
	किरकोळ खर्च	८९७१२.४०	
	वर्गणी खर्च	२८११५.००	
	वसुली खर्च	१४४१६.००	
	फ्रॉनकिंग चार्जेस	५२००.००	
	जाहिरात खर्च	५०४३८.००	३०८३९९३.०५
९३२३९९.००	११) तरतुदी		
	संशयित बुडीत कर्ज निधी तरतुद खर्च	८०००००.००	
	स्टँडर्ड असेट तरतुद खर्च	०.००	
	सरकारी रोखे अमॉर्टरायझेशन खर्च	२६५१०.००	८२६५१०.००
११८३३००.००	१२) इन्कम टॅक्स	१२४५९२२.००	१२४५९२२.००
१८१५९००.०९	१३) नफा	३१३८४८८.६०	३१३८४८८.६०
३७४६०८४४.०५	एकूण		४६७१०४५७.५६

लेखापरिक्षण अहवालातील शेऱ्यासपात्र राहून बरोबर आहे.

सरकारी लेखापरिक्षक

एस. आर. चौरसिया अँन्ड कंपनी चार्टर्ड अकौटंटस्, सातारा

दि. १।४।२०११ ते ३१।३।२०१२ अखेर

रक्कम ३१/०३/२०११	उत्पन्न	रक्कम ३१।०३।२०१२	रक्कम ३१।०३।२०१२
३७४६०८४४.०५	एकूण		४६७१०४५७.५६

सौ. रेखा सु. कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी

सौ. निर्मला म. मोरे
उपाध्यक्षा

सौ. चेतना वि. सिन्हा
अध्यक्षा

सर्व संचालक मंडळ

सन २०१२ - २०१३ चे

खर्च	३१/३/२०१२ चा अंदाजे खर्च	३१/३/२०१२ प्रत्यक्ष खर्च	३१/३/२०१२ चा जादा खर्च	२०१२-२०१३ चा अंदाजे खर्च
व्याज दिले				
१) ठेवीवरील	२७५५८३७२.००	२९६७६३६६.९१	२११७९९४.९१	३८२२३०८७.००
२) बँक ओ.डी. वरील	५००००००	३१०४३०.००	०.००	५०००००.००
सेवक पगार बोनसखर्च,सेवक विमा	६००००००.००	४७५००१८.००	०.००	६५०००००.००
छपाई,स्टेशनरी व जाहीरात खर्च	७५००००.००	३८१४७३.००	०.००	५०००००.००
एजंट कमिशन	३००००००.००	२३४२३८९.९५	०.००	२५०००००.००
पोस्टेज व टेलीफोन खर्च	३५००००.००	२९४५६१.००	०.००	३५००००.००
लाईट, ऑफिस भाडे विमा व खर्च	३६०००००.००	१३८२९३५.००	०.००	१८०००००.००
संचालक मिटींग व प्रवास भत्ते	२०००००.००	९०२४६.००	०.००	२०००००.००
सेवक प्रशिक्षण खर्च	१५००००.००	२०३४.००	०.००	१०००००.००
वार्षिक अहवाल व सभा खर्च	२०००००.००	६३४३४.००	०.००	१५००००.००
ऑडीट फी व ऑडीट खर्च	५०००००.००	१६९७८७.००	०.००	४०००००.००
शिक्षण निधी तरतूद	१००००.००	१००००.००	०.००	१५०००.००
घसारा व डेडस्टॉक दुरुस्ती खर्च	२००००००.००	१३९८१३१.००	०.००	१८०००००.००
इतर तरतूदी	१५०००००.००	८२६५१०.००	०.००	१२०००००.००
आय एस ओ खर्च	१०००००.००	०.००	०.००	०.००
बँक प्राथमिक खर्च	१०००००.००	०.००	०.००	१०००००.००
इतर खर्च	१५०००००.००	१८७३६५३.१०	३७३६५३.१०	२५०००००.००
नफा	३५३४२३५.००	३१३८४८८.६०	०.००	४४३८९२७.००
	५११५५२६०७.००	४६७१०४५७.५६	२४९१६४८.०१	६१२७७०१४.००

अंदाज पत्रक

उत्पन्न	३१/३/२०१२ चे अंदाजे उत्पन्न	३१/३/२०१२ प्रत्यक्ष उत्पन्न	३१/३/२०१२ चे जादा उत्पन्न	२०१२-२०१३ चे अंदाजे उत्पन्न
व्याज आले				
१) कर्जावरील	४०७८५९७१.००	३९४०४८०८.६२	०.००	५०७०४०५०.००
२) गुंतवणुकीवरील	३६८८९१५.००	१५२०९२६.००	०.००	२०८०१६८.००
३) सरकारी रोख्यावरील	५६४१८७१.००	५४२४०५६.२४	०.००	७५०५२४६.००
लाभांश	५०.००	५०.००	०.००	५०.००
कमिशन	२०००००.००	१९६०१३.००	०.००	१०००००.००
लॉकर भाडे	१०८००.००	१३७४०.००	२९४०.००	१२५००.००
इतर उत्पन्न	७०००००.००	०.००	०.००	४०००००.००
सर्व्हिस चार्जेस	३५००००.००	१५०८६३.७०	०.००	४०००००.००
स्टेशनरी	५००००.००	०.००	०.००	०.००
फॉर्म फी	१०००००.००	०.००	०.००	५००००.००
चेक बुक चार्जेस	२५०००.००	०.००	०.००	२५०००.००
	५११५५२६०७.००	४६७१०४५७.५६	२९४०.००	६१२७७०१४.००

आभार

सध्याच्या बँकींग क्षेत्रातील जगातील स्पर्धेमध्ये वाढती जबाबदारी स्वीकारुन, अग्रेसर राहण्याचा विश्वास आपणा सर्वांमध्ये निर्माण झाला आहे. विविध प्रकारच्या ठेवी व कर्जवाटपाच्या योजना राबवून सभासदांची आर्थिक व सामाजिक प्रगती करताना त्यांच्या शैक्षणिक व आरोग्याच्या बाबींकडे लक्ष द्यावयाचे आहे. या कामात सर्व सहकारी संस्था,संचालिका,सेवकवर्ग, सभासद, ठेवीदार,कर्जदार व हितचिंतक यांचे पुर्ण सहकार्य लाभेल असा विश्वास आहे.

मी वैयक्तिकरित्या भारतीय रिझर्व्ह बँक गर्व्हनर मा. डी. सुब्बाराव, श्रीमती उषा थोरात माजी डेप्युटी गर्व्हनर, भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई, डॉ. के. सी. चक्रवर्तीसाहेब, डेप्युटी गर्व्हनर भारतीय रिझर्व्ह बँक,मुंबई, मा. कुमारी कमला राजन, प्रिन्सीपल, सीजीएम, कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चरल बँकिंग, पुणे, श्री. राजगोपाल देवरा, सहकार सचिव, महाराष्ट्र राज्य, मा. सहकार आयुक्त पुणे, मा. श्री. दिनेश ओहळकर, अतिरिक्त सहकार आयुक्त पुणे, मा. श्री. प्रभाकर देशमुख ॲग्रीकल्चरल कमिशनर, पुणे, मा.डॉ. रामास्वामी एन.,जिल्हाधिकारी, सातारा, श्री. अरुण काकडे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सातारा, मा. श्री. के. एम. प्रसन्ना, पोलीस अधिक्षक, मा. श्री. शाम देशपांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, श्री. विकास जाधव, सहा. निबंधक सहकारी संस्था, दहिवडी, भारतीय रिझर्व्ह बँकेचे आजी माजी अधिकारी वर्ग, महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन, मुंबई, महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक, मुंबई, बँक ऑफ इंडियाचे अधिकारी वर्ग, सातारा जिल्हा नागरी बँक असोसिएशन, सातारा, जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि.,सातारा, आय.डी.बी.आय., एस.बी.आय.बँक, ॲक्सीस बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, सीडबी मुंबई, श्रीमती नैनालाल किडवाई, एचएसबीसी च्या भारतातील प्रमुख व विभागीय सरव्यवस्थापक, ॲक्सेंचर, कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग,कॅनडा, ब्रिटीश एशिया ट्रस्ट, यु.के., बोनिटा ट्रस्ट, यु.के. दसरा सामाजिक संस्था, ॲक्शियॉन मायक्रोफायनान्स, कायदेविषयक सल्लागार, लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. वडूज विभाग तसेच उपविभाग वडूज, दहिवडी, लोणंद, वृत्तपत्र संपादक, सातारा जिल्हा वार्ताहार, ओबीसी महामंडळ, सातारा जिल्हा कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, तसेच बँकेच्या प्रगतीस प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रितीने सहकार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचे हार्दीक आभार !

धन्यवाद !

जयहिंद ! जय महाराष्ट्र ! जय सहकार !

आपली स्नेहांकित

श्रीमती चेतना विजय सिन्हा

अध्यक्षा

पोटनियम दुरुस्तीबाबतची(पुरवणी ३री)

पोटनियम अनुक्रमांक	सध्याच्या पोटनियमाची शब्द योजना	दुरुस्त झाल्याप्रमाणे पोटनियमाची शब्द योजना	दुरुस्तीचे कारण
1	**Area of Operation:** The area of operation of bank shall be confirmed to Satara,Solapur,Raigad, Kolhapur, Pune, Sangli, Ratnagiri district	**Area of Operqtion:** The area of operation of bank shall be confirmed to Satara,Solapur,Raigad, Kolhapur, Pune, Sangli, Ratnagiri and Nashik district	To extend the banking business and to increase outreach the women
१	बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण सातारा, सांगली, सोलापूर, रत्नागिरी, रायगड पुणे व कोल्हापूर जिल्हापुरते मर्यादित राहील.	बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण सातारा, सांगली, सोलापूर, रत्नागिरी, रायगड, पुणे, कोल्हापूर आणि नाशिक जिल्हापुरते मर्यादित राहील.	बँकींग व्यवसाय वृद्धीसाठी व महिलांच्या उन्नतीसाठी
2	**Authorized Share Capital:** The Authorized Share capital is Rs 5,00,00,000/-(Rupees Five crore only) divided in to 5,00,000 share of Rs.100/- each which should be paid in full on application	**Authorized Share Capital:** The Authorized Share capital is Rs 7,00,00,000/-(Rupees Seven crore only) divided in to 7,00,000 share of Rs. 100/- each which should be paid in full on application	Due to increasing business of Bank and fulfill the condition of the shares Linking as per By Laws No. 42 increasing of capital adequacy ratio.
२	बँकेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५,००,००,०००/-(रु.पाच कोटी फक्त) असून भागाची दर्शनी किंमत रु. १००/- (प्रती भाग रु. शंभर) राहील. भागभांडवल ५,००,००० भागात विभागलेले असेल.	बँकेचे अधिकृत भाग भांडवल रु. ७,००,००,०००/-(रु. सात कोटी फक्त)असून भागाची दर्शनी किंमत रु. १००/-(प्रती भाग रु. शंभर) राहील. भागभांडवल ७,००,००० भागात विभागलेले असेल.	बँकींग व्यवसाय वाढल्याने आणि शेअर भागभांडवल बाबत पोटनियम क्रं. ४२ ची पुर्तता करणेसाठी. भांडवल पर्याप्तता प्रमाण वाढवणे करिता.

माणदेशी महिला सह. बँक लि. म्हसवड ता. माण

बँकेची प्रगती

अ. क्र.	तपशील	२००२	२००३	२००४	२००५	२००६	२००७	२००८	२००९	२०१०	२०११	२०१२
१	सभासद संख्या	२१०८	२३५०	२६१३	३०५८	४५६७	५९६१	७६३०	९३९२	११३६६	११८७१	१२२२०
२	भागभांडवल	२३.८९	३०.५४	३५.२२	४२.८६	६९.१९	१०२.३१	१४८.२०	१८३.५४	२२३.४२	२६०.०६	२७६.५३
३	एकूण ठेवी	२६९.३६	३६७.९०	५००.०३	६३०.७४	८२६.२६	१०३०.३४	१३२६.४६	१७८२.३०	२७२१.५६	३३३८.२५	४०००.००
४	एकूण कर्जवाटप	२०३.२२	२६४.२०	३५२.३३	४३३.५३	६११.६०	७६५.६३	८५९.३५	९९०.५८	१४४२.१४	२२४०.९९	२६४१.८३
५	गुंतवणूक	६३.३८	९८.६३	११६.६६	१७७.३२	१९८.३८	२५८.९५	५५३.८९	८७५.११	१०२९.९३	८३९.६१	१२११.३३
६	खेळते भांडवल	३०३.००	४०४.७७	५४५.६३	६८६.८८	९१५.३५	१२३३.०३	१६२८.९६	२११४.११	३०८४.५३	३७३३.१५	४४९१.३१

माणदेशी खेळाडूंची बालेवाडी येथे निवड होण्यासाठी मा. आ. जयकुमार गोरेभाऊ यांनी
पुढाकार घेऊन विधानसभेमध्ये ''लक्षवेधी सूचनेत'' विषय मांडला. बालेवाडी, पुणे क्रीडा प्रबोधीनित माणदेशी चॅम्पियन
क्रीडा संकुलनमधील २८ विद्यार्थ्यांची निवड, छायाचित्रात निवड झालेले २८ विद्यार्थी व त्यांचे सोबत प्रशिक्षक

डॉ. अजितकुमार, सहा. महाप्रबंध, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कॅब, पुणे व भारतातील इतर राज्यातून ४० रिझर्व्ह बँकेच्या वरिष्ठ
अधिकाऱ्यांनी माणदेशी बँकेस भेट देवून, बचत गटाच्या महिलांशी चर्चा केली. त्याप्रसंगीचे छायाचित्र

सप्टेंबर २०११ मध्ये न्यूयॉर्क येथे झालेल्या ''क्लिटंन ग्लोबल इनिशिएटिव्ह'' कार्यक्रमाप्रसंगी
अमेरिकेचे माजी अध्यक्ष मा. श्री. बिल क्लिंटन, समवेत श्रीमती चेतना सिन्हा

माणदेशी फौंडेशनमार्फत सुमारे १०००० शेळ्यांना चारा वाटप केले त्याप्रसंगीचे छायाचित्र

मा. श्री. प्रभाकर देशमुख ॲग्रीकल्चरल कमिशनर, पुणे यांनी माणदेशी चारा छावणीस भेट दिली, समवेत मा. डॉ. रामास्वामी एन., जिल्हाधिकारी, सातारा





खा. मा. हुसेन दलवाई यांनी माणदेशी चारा छावणीस भेट देवून छावणीस पाण्याची टाकी देणगी म्हणून दिली त्याप्रसंगीचे छायाचित्र



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. पृथ्वीराज चव्हाण (बाबा) यांनी माणदेशी चारा छावणीस भेट देवून माहिती घेतली त्या प्रसंगीचे छायाचित्र, समवेत मा. श्री. सतेज पाटील राज्यमंत्री



मा. श्री. अरूण काकडे, जिल्हाउपनिबंधक, सातारा यांनी माणदेशी बँकेस भेट देवून बँकेच्या कार्याची माहिती घेतली त्याप्रसंगी बँकेच्या अध्यक्षा श्रीमती चेतना सिन्हा, बँकेच्या उपाध्यक्षा सौ. निर्मला मोरे व बँकेचे मा. संचालक मंडळ

माणदेशी चारा छावणीमध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. पृथ्वीराज चव्हाण (बाबा), मा. श्री. विजय सिन्हा, गटनेता म्हसवड नगरपरिषद यांचा सत्कार करताना, समवेत मा. श्री. पतंगराव कदम साहेब

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. पृथ्वीराज चव्हाण (बाबा), माणदेशी चारा छावणीमध्ये शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना

माण देशी
बँक

Under Certificate of Posting

प्रेषक :

श्रीमती चेतना सिन्हा

अध्यक्षा, माणदेशी महिला सह. बँक लि.,
म्हसवड, ता. माण, जि. सातारा.
फोन : (०२३७३) २७०१४१,
फॅक्स : (०२३७३) २७०७८८
website : www.manndeshibank.com
email : manndeshi.mahila@rediffmail.com

मुद्रक :

ओम प्रिंटर्स, म्हसवड

फोन : (०२३७३) २७०२८८

सभासद क्र. ______

बुक-पोस्ट

प्रति,
सौ./श्रीमती ______________________

____

____